ग्रामीण कृषि मौसम सेवा
अखिल भारतीय समन्वयीत कृषी हवामानशास्त्र संशोधन प्रकल्प
वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी – ४३१ ४०२
ईमेल - amfuparbhani@gmail.com

## मराठवाडा कृषि हवामान सल्ला पत्रक क्रमांक – ५७/ २०२४- २०२५ मंगळवार, दिनांक – १५.१०.२०२४

### मराठवाडयाकरीता चालू आठवडयातील हवामान अंदाज (दिनांक १६ ते २० ऑक्टोबर २०२४)

| हवामान घटक | जिल्हयाचे नाव | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | छ. संभाजी नगर | जालना | बीड | लातुर | धाराशिव | परभणी | हिंगोली | नांदेड |
| पाऊस (मिमी) | ४५.० | ४५.० | ५५.० | ४९.० | ५१.० | ४५.० | ५६.० | ४८.० |
| कमाल तापमान (अं.से.) | ३२.०-३३.० | ३२.०-३३.० | ३०.०-३१.० | ३२.०-३३.० | ३१.०-३३.० | ३२.०-३५.० | ३२.०-३५.० | ३२.०-३३.० |
| किमान तापमान (अं.से.) | २१.०-२२.० | २३.०-२४.० | २१.०-२२.० | २१.०-२२.० | २१.०-२२.० | २३.०-२५.० | २३.०-२५.० | २३.०-२५.० |
| ढग स्थिती (आकाश) | ढगाळ ते पूर्णत: ढगाळ | ढगाळ ते पूर्णत: ढगाळ | पूर्णत: ढगाळ | पूर्णत: ढगाळ | पूर्णत: ढगाळ | ढगाळ ते पूर्णत: ढगाळ | ढगाळ ते पूर्णत: ढगाळ | पूर्णत: ढगाळ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८०-८५ | ८५-८७ | ७३-७८ | ८५-९० | ७१-७८ | ७६-७८ | ७६-७८ | ८६-८९ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ५९-६९ | ४८-५४ | ४६-५४ | ६०-६७ | ६०-६७ | ७१-७५ | ७१-७५ | ५४-६० |
| वा-याचा वेग (किमी/तास) | ३-८ | ३-९ | २-९ | १-८ | २-१० | २-८ | ३-९ | २-७ |
| वा-याची दिशा | ईशान्य ते पूर्व | ईशान्य ते पूर्व-ईशान्य | ईशान्य ते पूर्व-आग्नेय | ईशान्य ते पूर्व | उत्तर ते पूर्व-ईशान्य | ईशान्य ते पूर्व-ईशान्य | उत्तर-ईशान्य ते पूर्व-ईशान्य | उत्तर-ईशान्य ते पूर्व-ईशान्य |

**हवामान सारांश / चेतावनी :**

प्रादेशिक हवामान केंद्र , मुंबई येथून प्राप्त झालेल्या अंदाजानुसार मराठवाडयात पुढील पाच दिवसात आकाश अंशत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे. दिनांक १५ ते १७ ऑक्टोबर रोजी मराठवाडयात तूरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. दिनांक १८ व १९ ऑक्टोबर रोजी धाराशिव, नांदेड, लातूर व बीड जिल्हयात तूरळक ठिकाणी वादळी वारा, मेघगर्जना, विजांचा कडकडाट, वाऱ्याचा वेग अधिक (ताशी ३० ते ४० कि.मी.) राहून काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. मराठवाडयात पुढील तीन दिवसात कमाल तापमानात १ ते २ अं.सं. ने हळूहळू वाढ होण्याची तर पुढील चार ते पाच दिवसात किमान तापमानात फारशी तफावत जाणवणार नाही.

**सामान्य सल्ला :**

विस्तारीत अंदाजानुसार (ईआरएफएस) मराठवाडयात दिनांक १८ ते २४ ऑक्टोबर दरम्यान पाऊस सरासरीपेक्षा जास्त व तापमान सरासरीएवढे राहण्याची शक्यता आहे.
सॅक, इसरो अहमदाबाद यांच्या उपग्रहाच्या बाष्पोत्सर्जनाच्या जिल्हानिहाय व तालूकानिहाय छायाचित्रानूसार मराठवाडयात बाष्पोत्सर्जनाचा वेग वाढलेला आहे.

**संदेश :** शेतकरी बांधवांनी काढणीस आलेल्या सोयाबीन पिकाची काढणी करून सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी, मळणी केलेल्या सोयाबीनची उन्हात वाळवूनच साठवणूक करावी.

| पिकांचे नाव | अवस्था | कृषी हवामान सल्ला |
|---|---|---|
| कापूस | बोंड लागणे ते बोंड वाढीची | कापूस पिकात किडींच्या व्यवस्थापनासाठी, फ्लोनिकॅमिड ५०% डब्ल्यूजी २ ग्रॅम किंवा बुप्रोफेझिन २५% एससी २० मिली किंवा डायनोटेफ्युरॉन २०% एसजी २.५ ग्रॅम किंवा डायफेनथ्यूरॉन ५० % डब्ल्यूपी १२ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी . कापूस पिकावरील गुलाबी बोंडअळीच्या व्यवस्थापनासाठी हेक्टरी ५ गुलाबी बोंडअळीसाठीचे कामगंध सापळे लावावेत. |
| तुर | वाढीची | तुर पिकात पाने गुंडाळणाऱ्या अळी व शेंगा पोखरणाऱ्या अळीच्या व्यवस्थापनासाठी ५ % निंबोळी अर्काची किंवा क्विनॉलफॉस २५% २० मिली किंवा इमामेक्टीन बेन्झोएट ५% ४.५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघाड बघून फवारणी करावी. |
| रब्बी ज्वारी | पेरणी, अंतर व बियाणे प्रमाण व बिजप्रक्रिया | खरीप पिकांची काढणी केल्यानंतर पाण्याची उपलब्धता असल्यास किंवा जमिनीत ओलावा असल्यास रब्बी ज्वारी पिकाची पेरणी लवकरात लवकर करून घ्यावी. बागायती रब्बी ज्वारी पिकाची पेरणी ३१ ऑक्टोबर पर्यंत करून घ्यावी. पेरणी ४५ X१५ सेंमी अंतरावर करावी. पेरणीसाठी हेक्टरी १० किलो बियाणे वापरावे. परेणीपूर्वी काणी रोग प्रतिबंधासाठी ३०० मेश गंधक ४ ग्रॅम प्रति किलो बियाणे याप्रमाणे बिजप्रक्रिया करावी. पोंगेमर व खोडमाशीच्या व्यवस्थापनासाठी थायामिथॉक्झाम ७० % ४ ग्रॅम किंवा इमिडाक्लोप्रिड ४८ % १४ मिली प्रति किलो बियाण्यास बिजप्रक्रिया करूनच पेरणी करावी. |
| गहू | जमिनीची निवड | गहू पिकाच्या उत्तम वाढीसाठी सुपिक जमिन निवडावी. जमिनीचा सामू ६.५ ते ७.५ असावा. कोरडवाहू गव्हाच्या लागवडीसाठी ओलावा टिकवून ठेवणाऱ्या जमिनीची निवड करावी. |
| केळी | वाढीची/ काढणी | केळी बागेत खतमात्रा दिली नसल्यास ५० ग्रॅम पोटॅश प्रति झाड देण्यात यावे. उपग्रहाच्या छायाचित्रानूसार बाष्पोत्सर्जनाचा वेग वाढलेला असल्यामूळे नविन लागवड केलेल्या केळी बागेत आवश्यकतेनूसार पाणी द्यावे. |
| आंबा | वाढीची | आंबा बागेत किडींचा प्रादूर्भाव दिसून येत असल्यास, बागेत किटकनाशकाची पावसाची उघाड बघून फवारणी करावी. आंबा बागेत एनएए ४ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघाड बघून फवारणी करावी. उपग्रहाच्या छायाचित्रानूसार बाष्पोत्सर्जनाचा वेग वाढलेला असल्यामूळे आंबा बागेत आवश्यकतेनूसार पाणी द्यावे. |
| द्राक्ष | छाटणी | उपग्रहाच्या छायाचित्रानूसार बाष्पोत्सर्जनाचा वेग वाढलेला असल्यामूळे छाटणी केल्यानंतर द्राक्ष बागेस आवश्यकतेनूसार पाणी द्यावे. द्राक्ष बागेत नविन फुटव्यावर रोगाचा प्रादूर्भाव होउ नये म्हणून रोगनाशकाची फवारणी करावी. |
| सिताफळ | फळवाढीची ते काढणी | उपग्रहाच्या छायाचित्रानूसार बाष्पोत्सर्जनाचा वेग वाढलेला असल्यामूळे नविन लागवड केलेल्या सिताफळ बागेस आवश्यकतेनूसार पाणी द्यावे. पूर्ण वाढलेल्या व काढणीस तयार असलेल्या सिताफळ फळांची काढणी करावी.सिताफळ बागेत पिठया ढेकून किडीचा प्रादूर्भाव दिसून आल्यास निंबोळी तेल ५० मिली किंवा लिकॅनिसिलीयम लिकॅनी ४० ग्राम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघाड बघून फवारणी करावी. |
| भाजीपाला | वाढीची / काढणी | भाजीपाला (मिरची, वांगे व भेंडी) पिकात रसशोषण करणाऱ्या किडीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास त्याच्या व्यस्थापनासाठी पायरीप्रॉक्सीफेन ५% + फेनप्रोपाथ्रीन १५% १० मीली किंवा डायमेथोएट ३०% १३ मीली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. भेंडी पिकावर फळे पोखरणाऱ्या अळीचा प्रादूर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ४.९ सीएस ६ मिली किंवा क्लोरँट्रानिलीप्रोल १८.५ एससी २.५ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून पावसाची उघाड बघून फवारणी करावी. भाजीपाला पिकात खूरपणी करून तण नियंत्रण करावे. उपग्रहाच्या छायाचित्रानूसार बाष्पोत्सर्जनाचा वेग वाढलेला असल्यामूळे भाजीपाला पिकास आवश्यकतेनूसार पाटाने पाणी द्यावे. |
| फुलशेती | काढणी | फुल पिकात खूरपणी करून तण नियंत्रण करावे. उपग्रहाच्या छायाचित्रानूसार बाष्पोत्सर्जनाचा वेग वाढलेला असल्यामूळे फुल पिकास आवश्यकतेनूसार पाटाने पाणी द्यावे. लांब दांड्याच्या फुलाची (गुलाब) काढणी करतांना कळी उमलण्याच्या अवस्थेत असतांना काढणी करावी तर झेंडू, आष्टर या सारख्या फुलांची काढणी पूर्ण उमलल्याच्या नंतर करावी. |
| पशुधन व्यवस्थापन | ---- | तापमानात वाढ झाल्यामूळे, जनावरांच्या गोठ्याच्या छतावर साळीचे गवत किंवा स्प्रींकलरची व्यवस्था करावी, जेणेकरून गोठ्याच्या आतील तापमानात घट होईल. जनावरांना सावलीत किंवा गोठ्यामध्ये बांधावे. गोठ्यात मुबलक प्रमाणात पिण्याचे पाणी ठेवावे. |

सदर कृषी हवामान सल्ला पत्रिका वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषी मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.

मुख्य प्रकल्प समन्वयक
ग्रामीण कृषी मौसम सेवा
वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी